२३५/-


महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक : बैठक-१८२२/प्र.क्र. २१२/बैठक/२८फेब्रु./२०२३/३५५ दिनांक : 14 MAR 2023

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०१/२०२३ व १४/०२/२०२३ रोजीची क्रमांक **६९वी बैठक मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. ची बैठक १ मार्च, २०२३ पर्यंत पुढे चालु ठेवण्यात आली,** सदरील बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्य प्रणालीद्वारे), डॉ. वि.एम. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व ३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही. सबब नोंद घेण्यात आली.

डॉ. राजीव आर. मिश्रा, संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई, डॉ. उत्तम सोनाजी कदम, संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि डॉ. गोविंद संगवई, सहा. संचालक (तांत्रिक), तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

13/3/23

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

**<u>विषय क्रमांक १:</u>** **<u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील खालील नमूद विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.</u>**

| अ. क्र. | बैठक वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १. | २८/०२/२०२३ | दुपारी १२:०० वा | तंत्र शिक्षण | B-Engieneering/B-Tech., B-Archtiecture, B-HMCT, M-Engineering/M-Tech., MBA/MMS, MCA, M-Architecture |
| | २८/०२/२०२३ | दुपारी ०३:०० वा. | कृषी शिक्षण | B.Sc. (Hons) Agriculture, B.Sc. (Hons) Horticulture, B.Sc. (Hons) Forestry, B. F. Sc.(Fishery Science), B. Tech. (Agricultural Engineering), B. Tech. (Food Technology), B.Sc. (Hons) Community Science and B. Tech. (Biotechnology), B.Sc. (Hons) Agri-business Management |
| | | सांय. ०४:३० वा | कला शिक्षण | B - Fine Arts |
| | | सांय. ०५:०० वा | उच्च शिक्षण | B.Ed./M.Ed. (Integrated) and B.A./B.Sc. -B.Ed. (Integrated) |

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी १) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, २) महासंचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व ३) संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अखत्यारितीतील खालील नमूद पत्रान्वये सादर केलेल्या महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय अहवालांचे अवलोकन करण्यात आले व तद्नुषंगाने निर्देश देण्यात आले,-

अ) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे क्रमांक २अ/एडीएम/२०२३/५३, दिनांक २७/०२/२०२३ रोजीचे पत्र,

ब) संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे क्रमांक मकृप/शिक्षण-१/१४२३/५७१, दिनांक २४/०२/२०२३ रोजीचे पत्र,

क) संचालक, कला संचालनालय, मुंबई यांचे क्रमांक डिओअे-२०२३/तीन/३११, दिनांक ८/०२/२०२३ रोजीचे पत्र

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २१/१२/२०२२ व ३०/०१/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State
1/3/23

२) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजी च्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले आहे. सबब याबाबत नोंद घेण्यात आली.

३) तसेच शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सयव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक मकृप १०१९/प्र.क्र. १०१/७-अे, दिनांक ११/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२० या वर्षापासून शासकीय/शासन अनुदानित/शासन अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयातील प्रवेश मान्यता आणि प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणाऱ्या खर्चाची प्रतीपूर्ती होण्यासाठी प्रवेश प्रक्रिया शुल्क आकारणी संबंधी मुद्यांबाबत शासनाच्या सदरील पत्रानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. त्यानुसार कृषी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी कार्यवाही झालेली असून सदरील उपसमितीने सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली. तसेच या अनुषंगाने १) श्री. महेंन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक् प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई २) श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व ३) डॉ. मंगेश ब. निकम, परीक्षा समन्वयक (कृषी शिक्षण), राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई तथा अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. उर्वरित अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित उपसमितीने कार्यवाही करुन अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

५) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील B.Ed./M.Ed. (Integrated) and B.A./B.Sc. -B.Ed. (Integrated) या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या तपासणी अहवालासह "प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव" अधिनियम २०१५ मधील विहित तरतूदींनुसार प्राधिकरणास सादर केलेला नसल्यामुळे सध्या सदरील प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. संबंधित महाविद्यालयाच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर व प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर प्रवेश मान्यतेबाबत निर्णय घेण्यात येईल.

६) अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम <u>(प्रपत्र-अ/महाविद्यालय-निहाय)</u> प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State
१३/३/२३

७) उक्त तालिकेतील तंत्र शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात येणाऱ्या १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेचा अहवाल प्राधिकरणास अप्राप्त असल्याने स्तंभ क्रमांक (१४) व (१५) मधील नमूद विद्यार्थ्यांची मान्यता १ टक्के पडताळणी समितीच्या अहवालाच्या अधीन राहुन देण्यात येत आहे. तथापि सदरील अहवालानुसार या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (पात्र/अपात्र) प्राधिकरण स्तरावर तदनंतर कार्यवाही करण्यात येईल, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी. उपसमितीने यासंदर्भात अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे.

८) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

९) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील कला शिक्षण अभ्यासक्रमास PWD संवर्गातील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची तपासणी १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेकरिता गठित करण्यात आलेल्या उपसमितीने करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

१०) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहे. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

११) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे (प्रपत्र-अ), अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नुसार) कार्यवाही करावी.

**<u>विषय क्रमांक २:</u>** **<u>शैक्षणिक वर्ष २०१६-१७, २०१७-१८, २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर केलेले नाही, अशा प्रकरणी दिनांक १४, १५, १६, २१ व २२ फेब्रुवारी २०२३ रोजी झालेल्या बैठकीस अनुसरुन निर्णय घेणे.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ज्या महाविद्यालयांनी संबंधित संचालनालयाने प्रमाणित केलेल्या "प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव" अद्याप प्राधिकरणास सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी दिनांक १४, १५, १६, २१ व २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण व सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्ष कक्ष, मुंबई आणि संबंधित संचालनालयाचे प्रतिनिधी यांच्या समोर बैठक घेण्यात आली, सदरील बैठकीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले,-

१) प्रस्तूत प्रकरणी ज्या महाविद्यालयांनी "प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव" विहित कालावधीमध्ये सादर केला नाही, अशा महाविद्यालयांना ताकिद देण्यात येत असून भविष्यात पुन्हा अशी चूक होऊ नये, याबाबत संबंधितांनी

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State
13/3/23

खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले. सद्यस्थितीमध्ये ज्या महाविद्यालयानी संबंधित संचालनालयाचा प्रवेश पडताळणी अहवाल, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रमाणित केलेली यादी व प्राधिकरणाचे विहित केलेले "प्रक्रिया शुल्क" सादर केले आहे, अशा व्यावसायिक महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास (प्रपत्र-ब) संबंधित संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी ज्या महाविद्यालयांनी अद्याप "प्रवेश मान्यता प्रस्ताव" (संबंधित संचालनालयाचा प्रवेश पडताळणी अहवाल, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रमाणित केलेली यादी व प्राधिकरणाचे विहित केलेले "प्रक्रिया शुल्क") सादर केलेला नाही व प्राधिकरणाच्या दिनांक १/०२/२०२३ रोजीच्या पत्रानुसार नियोजित बैठकीस उपस्थित राहिले नाहीत, अशा महाविद्यालयांच्या प्रवेश प्रकरणी अधिनियम २०१५ मधील कलम २०(५) नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश ना मंजुर करण्याबाबत तसेच विद्यापीठाचे संलग्निकरण/मान्यता रद्द करण्याबाबत संबंधित विद्यापीठांना शिफारस करण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले (प्रपत्र-क).

**विषय क्रमांक ३: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

**(क) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी सेवा पुरवठादार निश्चित करणेकामी राबविण्यात येणाऱ्या ई-निविदा प्रक्रियेत न्युनतम दर आलेल्या निविदाकार यांच्यामार्फत सादर करण्यात आलेल्या निविदेस मान्यता देणे बाबत.**

प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाच्या दिनांक १६/०२/२०२३ रोजीच्या टिपणींवर सांगोपांग चर्चा करुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील सामाईक प्रवेश परीक्षेसाठी रु. ४९५/- व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी रु. ३७५/- याप्रमाणे खुल्या स्पर्धात्मक ई-निवेदा प्रक्रियेद्वारे प्राप्त दरास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**(ख) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परिक्षांचे वेळापत्रक.**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सादर केलेल्या टिपणी व त्यासोबत जोडलेल्या वेळापत्रकाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या वेळापत्रकाची नोंद घेण्यात आली. सदरील प्रक्रियेकरिता नियुक्त करण्यात येणाऱ्या सेवापुरवठारा यांच्या समवेत करण्यात येणाऱ्या सामज्यंस कराराची व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांची माहिती पुस्तिका - प्रवेश नियमावली प्राधिकरणाच्या सर्व मा. सदस्य यांना पाठविण्यात यावी.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

१३/३/२३

(ग) **<u>प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत.</u>**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवा व वेतनवाढीबाबत कार्यालयाच्या दिनांक २४/०२/२०२३ रोजीच्या टिपणीवर सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागातील निव्वळ कंत्राटी तत्वावरील कार्यरत गट - क व गट - ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्तेबाबत भोसले समितीच्या अहवालास अनुसरुन प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ७/०४/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय क्रमांक २ (ख) नुसार मान्यता देण्यात आलेल्या वेतनानुसार माहे २ मार्च २०२३ पासून ५% दराने वेतन वाढ करण्याचा तसेच ११ महिन्यांकरिता नियुक्तीस (१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन) मुदतवाढ देण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे **<u>(प्रपत्र-ड)</u>**.

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष कार्यालयातील मंजुर पदांच्या अनुषंगाने कार्यरत कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा निश्चितीबाबत व संबंधित पदांच्या भरतीबाबतचे नियम व पात्रता तपासून प्रस्ताव सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक ४(२) अन्वये निर्देश दिलेले आहेत.याबाबत त्वरीत अमंलबजावणी करावी. तथापि, कार्यालयातील कामाची गरज लक्षात घेता मंजुर पदांपैकी सध्या कार्यरत असलेल्या पदे/कर्मचारऱ्यांव्यतिरिक्त इतर रिक्त असलेल्या पदांवर भरती करण्याची आवश्यकता भासल्यास बाह्यस्त्रोता मार्फत नियमाप्रमाणे नियुक्ती करण्यात यावी.

(घ) **<u>न्यायालयीन प्रकरण : याचिका क्रमांक ६३५१/२०२२ मधील दिनांक ७/०२/२०२३ रोजीचे न्यायालयीन आदेश - व्ही.एस.पी.एम. चे कॉलेज ऑफ फिजीओथेरेपी, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी भौतिकोपचार अभ्यासक्रमास प्रवेशित कु. रिगनाथे श्रध्दा तनगिर यांच्या प्रवेश प्रकरणी.</u>**

सदर प्रकरणाचे संबंधीत कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले व याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

व्ही.एस.पी.एम.चे कॉलेज ऑफ फिजीओथेरेपी, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी भौतिकोपचार अभ्यासक्रमास प्रवेशित कु. श्रध्दा तनगिर रिगनाथे यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठ, नागपुर येथील याचिका क्रमांक ६३५१/२०२२ मधील दिनांक ०७/०२/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशानुसार कु. श्रध्दा रिगनाथे व संबंधित महाविद्यालय यांना मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर दिनांक २०/०२/२०२३ रोजी सुनावणी झालेली आहे. प्रस्तूत प्रकरणी कु. श्रध्दा रिगनाथे यांच्या प्रवेशा संदर्भात महाविद्यालयाकडून झालेल्या निष्काळजीपणा बाबत रु. १ लाख दंड आकारण्यात येत असून, सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थीनी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येऊ नये, या अटींवर सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State
13/3/23

येत आहे. तसेच दंडाची रक्कम प्राधिकरणास १० दिवसांत सादर करणे बंधनकारक राहील, याबाबत संबंधित महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

(ङ) **<u>न्यायालयीन प्रकरण : याचिका क्रमांक ५११६/२०२२ मधील दिनांक १२/१२/२०२२ रोजीचे न्यायालयीन आदेश - महात्मा गांधी कॉलेज ऑफ नर्सिंग, वर्धा येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. प्राची अमोल पराये यांच्या प्रवेश प्रकरणी.</u>**

सदर प्रकरणाचे संबंधीत कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले व याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

महात्मा गांधी कॉलेज ऑफ नर्सिंग, वर्धा येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. प्राची अमोल पराये यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठ, नागपुर येथील याचिका क्रमांक ५११६/२०२२ मधील दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशानुसार कु. प्राची अमोल पराये व संबंधित महाविद्यालय यांना मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर दिनांक ३१/०१/२०२३ रोजी सुनावणी झालेली आहे. प्रस्तूत प्रकरणी कु. प्राची अमोल पराये यांच्या प्रवेशा संदर्भात महाविद्यालयाकडून झालेल्या निष्काळजीपणा बाबत रु. १ लाख दंड आकारण्यात येत असून, सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थीनी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येऊ नये, या अटींवर सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच दंडाची रक्कम प्राधिकरणास १० दिवसांत सादर करणे बंधनकारक राहील, याबाबत संबंधित महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

(च) **<u>न्यायालयीन प्रकरण : याचिका क्रमांक ५०५६/२०२२ मधील दिनांक १२/१२/२०२२ रोजीचे न्यायालयीन आदेश - सेंट्रल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, गोंदिया येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जामरे राजेश्वरी कालीराम यांच्या प्रवेश प्रकरणी.</u>**

सदर प्रकरणाचे संबंधीत कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले व याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

सेंट्रल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, गोंदिया येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जामरे राजेश्वरी कालीराम यांच्या प्रवेश प्रकरणी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर दिनांक १३/०१/२०२२ रोजी सुनावणी झालेली आहे. या संदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक २/०६/२०२२ रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठ, नागपुर येथील याचिका क्रमांक ५०५६/२०२२ मधील दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशाची नोंद घेण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी कु. जामरे राजेश्वरी कालीराम यांच्या प्रवेशा संदर्भात महाविद्यालयाकडून झालेल्या निष्काळजीपणा बाबत रु. १ लाख दंड आकारण्यात येत असून, सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थीनी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येऊ नये, या अटींवर सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच दंडाची रक्कम प्राधिकरणास १० दिवसांत सादर करणे बंधनकारक राहील, याबाबत संबंधित महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

(छ) **ए.सी.पी.एम. चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

सदर प्रकरणाचे संबंधीत कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले व याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान ए.सी.पी.एम.चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिये संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी व तदनुषंगाने प्रस्तूत प्रकरणी मा. उच्च् न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद व मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या अनुक्रमे रिट याचिका क्रमांक ६२१३/२०२० व स्पेशल लिव्ह अपील क्रमांक १२४९६/२०२१ मध्ये दिनांक २३/०४/२०२१ व १९/०८/२०२१ रोजीच्या न्यायालयीन आदेशाचे तसेच याचिका क्रमांक ६२१३/२०२० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायालयीन आदेशास अनुसरुन १) डॉ. के.डी. चव्हाण, माजी कुलसचिव, महाराष्ट्र आरोगय विज्ञान विद्यापीठ, नाशिक, २) डॉ. पी.एच. शिनगारे, माजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व ३) आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या गठित त्रिसदस्यी उप-समितीच्या दिनांक २३/०८/२०२१ रोजीच्या अहवालाचे अवलोकन करण्यात आले.

त्रिसदस्यी समितीच्या अहवालानुसार ए.सी.पी.एम.चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिये संदर्भात ताशेरे ओढण्यात आलेले आहेत, याबाबत प्राधिकरणाने नोंद घेण्यात आलेली आहे.

सबब या प्रकरणी वस्तूस्थित विचारात घेता, अहवालानुसार ए.सी.पी.एम.चे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत असून, संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिये दरम्यान महाविद्यालयाकडून झालेल्या निष्काळजीपणा बाबत रु. १० लाख दंड आकारण्यात येत असून, सदरील दंडाची रक्क्म संबंधित विद्यार्थीनी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येऊ नये, या अटींवर सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच दंडाची रक्क्म प्राधिकरणास १० दिवसांत सादर करणे बंधनकारक राहील, दंडाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्यात येईल, याबाबत संबंधित महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

(ज) **महात्मा गांधी मिशनचे दंत महाविद्यालय, नवी मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. आदित्य दिनेश धिरवानी यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

सदर प्रकरणाचे संबंधीत कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले व याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

महात्मा गांधी मिशनचे दंत महाविद्यालय, नवी मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमास प्रवेशित डॉ. आदित्य दिनेश धिरवानी यांच्या प्रवेश प्रकरणी मा. प्रवेश नियमाक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये विषय सूची क्रमांक २(ङ) मधील निर्देशान्वये सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी प्रलंबित कामाचा निपटारा त्वरीत होण्याच्या

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State
13/3/23

अनुषंगाने प्राधिकरणाचे दिनांक १७/१०/२०२२, १५/११/२०२२, ११/०१/२०२३ व १८/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आहेत, अशा विद्यार्थ्यांची पुन:श्च प्रवेश पडताळणी/तपासणी करुन सुस्पष्ट अहवाल विहित नमुन्यामध्ये सादर करण्याबाबत सर्व संबंधित संचालकांना निर्देश देण्यात आलेले आहेत, परंतू संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष व महाविद्यालय-निहाय अहवाल सादर केलेले आहेत. परंतू सदरील अहवालामध्ये डॉ. आदित्य दिनेश धिरवानी यांच्या प्रवेशाबाबत अहवाल नमूद नाही.

डॉ. आदित्य दिनेश धिरवानी यांचा प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा मार्फत झाला असल्याचे सीईटी कक्षाच्या निवडपत्रानुसार स्पष्ट होत आहे.

प्रस्तूत प्रकरणी डॉ. आदित्य दिनेश धिरवानी यांच्या प्रवेशा संदर्भात महाविद्यालयाकडून झालेला निष्काळजीपणा ही बाब व प्रवेशित विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित विचारात घेता महात्मा गांधी मिशनचे दंत महाविद्यालय, नवी मुंबई यांना रु. ०५ लाख दंड आकारण्यात येत असून, सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थीनी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येऊ नये, या अटींवर सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच दंडाची रक्कम प्राधिकरणास १० दिवसांत सादर करणे बंधनकारक राहील, याबाबत संबंधित महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

(झ) <u>श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जागृती तेलवाने यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

सदर प्रकरणाचे संबंधीत कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले व याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जागृती तेलवाने यांच्या प्रवेश प्रकरणी मा. प्रवेश नियमाक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये विषय सूची क्रमांक २(ङ) मधील निर्देशान्वये सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी प्रलंबित कामाचा निपटारा त्वरीत होण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाचे दिनांक १७/१०/२०२२, १५/११/२०२२, ११/०१/२०२३ व १८/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आहेत, अशा विद्यार्थ्यांची पुन:श्च प्रवेश पडताळणी/तपासणी करुन सुस्पष्ट अहवाल विहित नमुन्यामध्ये सादर करण्याबाबत सर्व संबंधित संचालकांना निर्देश देण्यात आलेले आहेत, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष व महाविद्यालय-निहाय अहवाल सादर केलेले आहेत.

कु. जागृती तेलवाने यांचा प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा मार्फत झाला असल्याचे सीईटी कक्षाच्या निवडपत्रानुसार स्पष्ट होत आहे.

प्रस्तूत प्रकरणी कु. जागृती तेलवाने यांच्या प्रवेशा संदर्भात महाविद्यालयाकडून झालेला निष्काळजीपणा ही बाब व प्रवेशित विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित विचारात घेता श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

१३/३/२३

महाविद्यालय, पुणे यांना रु. ०५ लाख दंड आकारण्यात येत असून, सदरील दंडाची रक्क्म संबंधित विद्यार्थीनी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येऊ नये, या अटींवर सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच दंडाची रक्क्म प्राधिकरणास १० दिवसांत सादर करणे बंधनकारक राहील, याबाबत संबंधित महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

(ञ) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा.

तसेच आज रोजी घेण्यात आलेली प्राधिकरणाची क्रमांक ६९वी बैठक मंगळवार, दिनांक २८/०३/२०२३ रोजी ठिक दुपारी १२:३० वा. पुन्हा पुढे घेण्यात येईल.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता १) संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई, २) संचालनालय, कला शिक्षण, मुंबई व ३) महासंचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 13/3/23

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State